MHBI120008102013

## नियमीत दिवाणी दावा क्र.११३/२०१३ मधील नि.क्र. ९५ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे जबाबदाव्यामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. सदर प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्यात दि.१७.०७.२०१४ रोजी त्यांचा जबाबदावा दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.१ चा फेरफार क्र.५६४५ हा नोंदणीकृत खरेदीखत क्र.११७१/२००१ दि.१६.०५.२००१ आधारे मंजूर झाला. त्यानंतर प्रस्तुत फेरफार क्र.५६४५ बाबत वादीने उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे केंव्हाही अपील केलेले नाही व सदरचा फेरफार आजपावेतो कायम आहे. जमीन स.नं.५०३/१ क्षेत्रफळ ११ हे.–६३ आर यातील ०१ हे.–८९आर जमीन प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केली तिच जमीन प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ व ३ यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र.१२७२/२०१३, दि.२०.१०.२०१३ रोजी कायमस्वरूपी विक्री केली व प्रत्यक्ष कब्ज्यास दिली व त्यावर प्रतिवादी क्र.२ व ३ मालकी हक्काने काबीज आहेत. सदर खरेदीखताआधारे फेरफार क्र.९८४५ नोंदवण्यात आला आहे. सदर फेरफारास वादींनी आक्षेप घेतल्यानंतर सदरचा फेरफार तहसीलदार, धारूर यांनी स्थगीत केला. तहसीलदार, धारुर यांचे निर्णयाविरूध्द उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्याकडे दाखल केलेले अपील नामंजूर करण्यात आले. उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांचे निर्णयाविरूध्द प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई याच्याकडे दाखल केलेले अपील दि.०४.०४.२०१८ रोजी मंजूर करण्यात आले. अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांचे निर्णयाविरूध्द वादीने अप्पर विभागीय आयुक्त क्र.२, औरंगाबाद येथे अपील दाखल केले. त्या अपिलाचा निर्णय

दि.२८.०६.२०२१ रोजी झाला व अपील खारीज करण्यात आले. अप्पर विभागीय आयुक्त क्र.२, औरंगाबाद यांचे निर्णयाविरूध्द वादीने राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे अपील दाखल केले. सदर अपिलात देखील दि.०२.०२.२०२२ रोजी वादींचे विरूध्द निर्णय देण्यात आलेला आहे.

३. सदर प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यात जबाबदावा व से सादर करतेवेळी वरील वाद चालूच होता व अपिलाचे निर्णय झालेले नव्हते. त्यामुळे मुळ जबाबदाव्यात वादी यांना दुरूस्ती करणे आवश्यक व जरूरीचे आहे. वरील नमूद दुरूस्ती जबाबदाव्यात केली तरच वरील बाबी प्रतिवादींना पुराव्यात कथन करता येतील. त्यामुळे या प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाचे परिच्छेद क्र.१३ मध्ये नमूद केलेली दुरूस्ती त्यांचे जबाबदाव्यात करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

४. सदर अर्जास वादी यांनी निशाणी ९८ येथे म्हणणे दाखल करून कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा पुरावा गोळा करण्याच्या हिशोबाने दिलेला आहे. प्रतिवादी यांनी पुष्कळ वेळा दुरूस्त जबाबदावे दिलेले आहेत. दावा प्रलंबित करण्याच्या हेतूने प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज टेनेबल नसल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

६. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**

७. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा कायम मनाई हुकम मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्यात दि.१७.०७.२०१४ रोजी त्यांचा जबाबदावा दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.१ चा फेरफार क्र.५६४५ हा नोंदणीकृत खरेदीखत क्र.११७१/२००१ दि.१६.०५.२००१ आधारे मंजूर झाला. त्यानंतर प्रस्तुत फेरफार क्र.५६४५ बाबत वादीने उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे केंव्हाही अपील केलेले नाही व सदरचा फेरफार आजपावेतो कायम आहे. जमीन स.नं.५०३/१ क्षेत्रफळ ११ हे.–६३ आर यातील ०१ हे.–८९आर जमीन प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केली तिच जमीन प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ व ३ यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र.१२७२/२०१३, दि.२०.१०.२०१३ रोजी कायमस्वरूपी विक्री केली व प्रत्यक्ष कब्ज्यास दिली व त्यावर प्रतिवादी क्र.२ व ३ मालकी हक्काने काबीज आहेत. सदर खरेदीखताआधारे फेरफार क्र.९८४५ नोंदवण्यात आला आहे. सदर फेरफारास वादीने आक्षेप घेतल्यानंतर सदरचा फेरफार तहसीलदार, धारूर यांनी स्थगीत केला. तहसीलदार, धारुर यांचे निर्णयाविरूध्द उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्याकडे दाखल केलेले अपील नामंजूर करण्यात आले. उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांचे निर्णयाविरूध्द प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई याच्याकडे दाखल केलेले अपील दि.०४.०४.२०१८ रोजी मंजूर करण्यात आले. अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांचे निर्णयाविरूध्द वादीने अप्पर विभागीय आयुक्त क्र.२, औरंगाबाद येथे अपील दाखल केले. त्या अपिलाचा निर्णय दि.२८.०६.२०२१ रोजी झाला व अपील खारीज करण्यात आले. अप्पर विभागीय आयुक्त क्र.२, औरंगाबाद यांचे निर्णया विरूध्द वादीने राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दाखल केले. सदर अपिलात देखील दि.०२.०२.२०२२ रोजी वादीचे विरूध्द निर्णय देण्यात आलेला आहे. प्रस्तुत दाव्यात

जबाबदावा व से सादर करतेवेळी वरिल वाद चालूच होता व अपिलाचे निर्णय झालेले नव्हते. त्यामुळे मुळ जबाबदाव्यात वादी यांना दुरूस्ती करणे आवश्यक व जरूरीचे आहे. वरील नमूद दुरूस्ती जबाब दाव्यात केली तरच वरील बाबी प्रतिवादींना पुराव्यात कथन करता येतील. त्यामुळे या प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाचे परिच्छेद क्र.१३ मध्ये नमूद केलेली दुरूस्ती त्यांचे जबाबदाव्यात करण्यास परवानगी मागितली आहे.

८. प्रतिवादी मागत असलेली दुरूस्ती ही दावा प्रलंबित असतांना घडलेल्या गोष्टींबाबत आहे. सदरच्या बाबी या दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी गरजेच्या आहेत. त्यामुळे दावा प्रलंबित असताना झालेल्या घटनांमुळे प्रतिवादी यांना सदरील जबाबदावा दुरूस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. याकरीता प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या *श्रीमती शांताबाई नथ्थुजी ठाकरे वि. वसंत शामरावजी वानखेडे व इतर [२०१४(६) ऑल एमआर ८५२]* या न्यायनिवाड्याचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिवाड्यानुसार पुरावा सुरू असताना दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी ज्या महत्वाच्या बाबी गरजेच्या आहेत त्या बाबी जरी विलंबाने दुरूस्ती करून दाव्यात नमूद केल्या तरी त्यामुळे न्याय देण्यास मदत होते असे नमूद केले आहे. सदरची न्यायतत्वे प्रतिवादींना उपयोगी ठरतात. त्यामुळे प्रतिवादी मागतात त्याप्रमाणे दुरूस्ती केल्यास वादींचे नुकसान होणार नसुन दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून उभय पक्षकारांमधील वाद संपुष्टात येण्याकरीता सदर जबाबदावा दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. परंतु सदर दुरूस्ती मागण्यास प्रतिवादींना विलंब झाला आहे. सदर विलंबाबाबत खर्च आकारणे योग्य होईल. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२ व ३ चा अर्ज रू.५००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदर खर्चाची रक्कम वादी यांना पुढील तारखेपर्यंत द्यावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी पुढील तारखेपर्यंत खर्च रक्कम भरून जबाबदाव्यात योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दुरुस्त जबाबदाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2026.03.13 14:38:04 +0530

स्थळ-धारुर
दिनांक- १२.०३.२०२६

(एन.एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
धारुर

**:: Certificate of Stenographer ::**

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order. ”

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur